**Session**
**2021-22**



# Report on Activities of National Service Scheme (N.S.S.)

**DR. KHATRI MAHAVIDYALAYA, TUKUM, CHANDRAPUR**

**Contents:**

**Cover Page-1**

1. Report on Activities of National Service Scheme (NSS) ................................
2. NSS Unit of ACS College Tukum was started in the Year 1992 with an aim to "inculcate the social welfare thoughts in the students, and to provide service to the society without any prejudices..........................................................
3. NSS Advisory Committee Meeting ...............................................................
4. Regular Camp Activities ...........................................................................

# Report on Activities of National Service Scheme (NSS)

National Eservice Scheme is a Nobel experiment in academic expansion. It inculcates the spirit of voluntary work among the students and teachers through sustained community interaction. It brings academic institutions closer to society. NSS Unit of ACS College Tukum, Chandrapur has been started in the year 1992, volunteers involve actively in both special camp and regular camp activities.

National Service Scheme is an Indian Government sponsored Programme under the Department of Youth Affairs & Sports of the Government of India. It was launched in Gandhiji's Centenary year, 1969, aimed at "Developing Student's Personality through Community Service."

**NSS Unit of Dr. Khatri Mahavidyalaya, Tukum, Chandrapur was started in the year 1992 with an aim to "inculcate the social welfare thoughts in the students, and to provide service to the society without any prejudices.**

## NSS Advisory Committee Meeting

- The advisory committee members met together and planned the activities for the whole year under the guidance of Principal Dr. J. M. Kakde, NSS Programme Officer Dr. R. U. Murmade, Asstt. NSS Programme Officers Prof. A. S. Chahare & Prof. R. S. Walke and IQAC Coordinator Dr. N. R. Dahegaonkar. And member of the committee. The advisory committee met regularly to plan and discuss about various activities.
- To enable the students to understand the community in which they work.
- To understand themselves in relation to their community.
- To identify the needs and problems in the community in the solution of which they can be involved.
- To develop their education in finding practical solution to individual and community problems
- To develop competence required for group living and sharing responsibilities
- Gain skill in mobilizing community participation.
- To acquire leadership qualities and democratic attitude

- To develop capacity to meet emergencies and national disasters and
- To practice national integration.

The motto of NSS is "NOT ME, BUT YOU" This expresses the essence of democratic living and upholds the need for selfless services and appreciation of another man's point of view and also show consideration for fellw human beings. It insists that the welfare of an individual is ultimately dependent on the welfare of the society as a whole. The symbol of the National Service Scheme is based on the "Rath" wheel of the Konark Sun Temple situated in Orissa. These giant wheels of the Sun Temple portray the cycle of creation, preservation and release, and signify the movement in life across time and space. The design of the symbol, a simplified form of the Sun-chariot wheel primarily depicts movement. The wheel signifies the progressive cycle of life. It stands for continuity as well as change and implies the continuous striving of NSS for social transformation and upliftment.

NSS was formally launched on 24th September, 1969 the birth centenary year of the Father of Nation. Therefore, 24th September is celebrated every year as NSS DAY with appropriate programmes and activities.

- There are two types of activities (Regular Camp & Special Camp) to be conducted.
- All the activities should be focused towards achieving the objectives of NSS.

# Regular Activities

### कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तुकूम, चंद्रपूर

### राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे

### जागतिक पर्यावरण दिन अहवाल

पर्यावरण संतुलन काळाची गरज आहे. या उदात्त हेतूने कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तुकूम, चंद्रपूर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे वतीने कोविड -१९ चे सर्व नियम पाळून दि. ५ जून २०२१ रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच आयोजक राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख डॉ. आर. यु. मुरमाडे हे उपस्थित होते.

यावेळी महाविद्यालयाचे परिसरात विविध प्रकारची वृक्ष लागवड करण्यात आली. यावेळी मा. प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे आपल्या मनोगतात , 'सगळ्या नैसर्गिक साधन संपत्तीचे रक्षण आणि संवर्धन करण्याची जबाबदारी आपली सर्वांची असून सर्वांनी झाडे लावून व पाणी वाचवून पर्यावरणाचा योग्य समतोल राखण्याचा संकल्प करावा'. असे ते बोलत होते.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक विद्यार्थिनी कु. अश्विनी जाधव, कु. आयेशा शेख, गौरव घोंगे व शिक्षकेत्तर कर्मचारी तुषार रेलकुंटवार उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचा अहवाल आपल्या माहितीस सादर.



## डॉ. खत्री महाविद्यालय तुकूम येथे वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न :

स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय तुकूम, चंद्रपूर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग तर्फे दि. १० जुलै २०२१ रोजी महाविद्यालयाचे परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. एन. आर. दहेगावकर, आयोजक रा. से. यो. प्रमुख डॉ. आर. यु. मुरमाडे, प्रा. आशिष चहारे, इतर प्राध्यापक वृंद व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या जातीची वृक्षलागवड केली. पर्यावरण काळाची गरज या सामाजिक जाणीवेने कोरोना काळातही रा. से. यो. च्या विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण उपक्रमात हिरीरीने भाग घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे यांनी वृक्षारोपण उपक्रमाविषयी 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' या उक्तीप्रमाणे पर्यावरणाचे संरक्षण काळाची गरज असल्याचे ते याप्रसंगी बोलत होते.

यावेळी महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सामूहिकरीत्या महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण केले. त्यामध्ये शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. दीपक आकुलवार, श्री.तुषार रेलकुंटवार, सौ.वर्षा पारवे, श्री.हर्ष खोब्रागडे यांची उपस्थिती होती. वृक्षारोपण उपक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विजेंद्र टेंभुर्णे, आयेशा शेख, कावेरी राहंगडाले,गौरव घोंगे यांचे सहकार्य लाभले.



# डॉ. खत्री महाविद्यालय तुकूम, चंद्रपूर
# राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा
# आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय साक्षरता दिवस अहवाल
# ९ सप्टेंबर २०२१

आपल्या महाविद्यालयात रासेयो. विभागाचे वतीने दि.९ सप्टेंबर २०२१ रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.एम.काकडे हे अध्यक्षस्थानी होते. तर प्रमुख मार्गदर्शक राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. माधव गुरनुले, डॉ. टी.डी.कोसे, डॉ. ज्योत्सना मोहितकर, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. एन.आर. दहेगावकर व आयोजक रासेयो प्रमुख डॉ. आर.यु. मुरमाडे उपस्थित होते.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.एम. काकडे सर यांनी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवसाचे अनुषंगाने मौलिक मार्गदर्शन केले. इतरही मान्यवरांनी याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे आयोजन रासेयो. प्रमुख डॉ. आर यु. मुरमाडे, सह-अधिकारी प्रा. आशिष चहारे, प्रा. दिलीप बावणे यांनी केले. सदर अहवाल आपल्या माहितीस सादर.



## डॉ. खत्री महाविद्यालय तुकूम, चंद्रपूर
## राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा
## राष्ट्रीय सेवा योजना दिवस अहवाल
## २४ सप्टेंबर २०२१

डॉ. खत्री महाविद्यालय तुकूम, चंद्रपूर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे वतीने दि. २४ सप्टेंबर २०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस महाविद्यालयाचे ग्रंथालय कक्षात साजरा करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्षस्थानी माननीय प्राचार्य डॉ. जे.एम.काकडे हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. माधव गुरनुले हे होते. यावेळी डॉ. शरयू कटकमवार, रासेयो. प्रमुख डॉ. आर यु. मुरमाडे, सह अधिकारी प्रा. आशिष चहारे, प्रा. दिलीप बावणे उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.एम. काकडे यांनी यावेळी राष्ट्रीय सेवा योजना दिवसाचे महत्व पटवून दिले. तसेच प्रा. माधव गुरनुले यांनीही रासेयो.दिवसाचे औचित्याने आपले मनोगत व्यक्त केले.

सदर अहवाल आपल्या माहितीस सादर.



**डॉ. खत्री महाविद्यालय,तुकूम, चंद्रपूर**
**राष्ट्रीय सेवा योजना विभाग**
**कोविड -१९ लसीकरण मोहीम अहवाल**
**२८/१०/२०२१**

कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभाग महानगरपालिका चंद्रपूर व राष्ट्रीय सेवा योजना विभाग तर्फे शासनाच्या संदर्भ पत्र क्रमांक कोविड-१९ /मिशन युवा स्वास्थ्य/७९१/२१ नुसार महाविद्यालयात मा. प्राचार्य डॉ. जे.एम.काकडे तसेच संस्थेचे सचिव डॉ.एस.बी.कपूर यांचे प्रमुख मार्गदर्शनाखाली कोविड -१९ लसीकरण मोहीम दि.२८ ऑक्टोबर २०२१ रोजी राबविण्यात आली.

यावेळी मा.प्राचार्य डॉ. जे.एम. काकडे,तुकूम प्रभागातील डॉ. नयना उत्तरवार, डॉ. देवयानी भूत्ते, मनपा.आरोग्य विभागाचे डॉ. अतुल चटकी व गणेश राखुंडे यांचे प्रमुख मार्गदर्शनाखाली सदर अभियान राबविण्यात आले. यावेळी NAAC समन्वयक डॉ. पी.एम. तेलखडे,IQAC समन्वयक डॉ. एन. आर. दहेगावकर, डॉ. ज्योत्सना चटप, अधीक्षक पी.जी. राऊत यांची उपस्थिती होती.

यामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थी ३०,प्राध्यापक ०७ व परिसरातील नागरिक२०, असे एकूण ५७ जनांनी लसीकरणाचा लाभ घेतला.

सदर लसीकरण मोहीम राबविण्यासाठी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. आर.यु. मुरमाडे, सह अधिकारी प्रा. आशिष चहारे, एन.एस.एस. सहकारी प्रा. दिलीप बावणे, प्रा.आर.एस.वाळके, यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व रा.से.यो. चे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

सदर अहवाल आपल्या माहितीस सादर.



# डॉ. खत्री महाविद्यालय तुकूम, चंद्रपूर

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## कोरोनाने मृत्यू पावलेल्या कुटुंबातील व्यक्तींना आर्थिक मदत बाबतचा अहवाल :

डॉ. खत्री महाविद्यालय तुकूम, चंद्रपूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे वतीने दि. ४ ऑक्टोबर २०२१ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.एम. काकडे यांचे मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून कोरोनाने मृत्यू पावलेल्या कुटुंबातील व्यक्तींना आर्थिक मदत हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी मातोश्री विद्यालय तुकूम परिसरातील कोरोनाने मृत्यू पावलेल्या कुटुंबातील व्यक्तींना सामाजिक बांधिलकी स्वीकारून श्रीमती प्रभा कैलास कारमेंगे या गरजू कुटुंबाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.एम. काकडे यांचे हस्ते तांदूळ, गहू व तुरीची डाळ या वस्तूचे वाटप करण्यात आले.

यावेळी रा.से.यो.प्रमुख डॉ. आर.यु.मुरमाडे, सहप्रमुख प्रा. आशिष चहारे, प्रा. दिलीप बावणे तसेच स्वयंसेवक पवन वडस्कर,निखील लांडगे व इतर स्वयंसेवक उपस्थित होते.



## डॉ. खत्री महाविद्यालय तुकूम, चंद्रपूर

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## तहसिल कार्यालय चंद्रपूर मदत कक्ष अहवाल

उपरोक्त संदर्भ पत्र क्र. का वि /म. सहा. सामान्य/ तह/ २०२१ /१०५३ नुसार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.एम. काकडे यांचे मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयं सेवकांनी तहसिल कार्यालय, चंद्रपूर येथे गरजूं नागरिकांकरिता मदत कक्ष येथे १ महिना सेवा दिली. नायब तहसिलदार डॉ. जितेंद्र गादेवार साहेब यांच्या मार्गदर्शनात आमच्या स्वयंसेवकांना प्रशिक्षण देण्यात आले. यात जमिनी संबंधी कामकाज, रेशनकार्ड, आधार कार्ड, उत्पन्नाचा दाखला, जातीचे प्रमाणपत्र अशा विविध कामाची माहिती मदत कक्षा द्वारे सर्व सामान्य लोकांना देण्यात आली. यामध्ये आमच्या महाविद्यालयातील १६ स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला.

सदर लोकोपयोगी उपक्रमासाठी रासेयो प्रमुख डॉ. आर. यु. मुरमाडे यांनी परिश्रम घेतले. सदर अहवाल आपल्या माहितीस सादर.



# डॉ. खत्री महाविद्यालय तुकूम, चंद्रपूर
# राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा
# मतदार नोंदणी व जनजागृती अभियान अहवाल
# २७ नोव्हेंबर २०२१

डॉ. खत्री महाविद्यालय तुकूम, चंद्रपूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभाग यांचे संयुक्त विद्यमाने दि. २७ नोव्हेंबर २०२१ रोजी दुर्गापूर येथील नेरी परिसरात मतदार नोंदणी व जनजागृती अभियान कार्यक्रम राबविण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ. जे.एम. काकडे हे अध्यक्षस्थानी होते. तर प्रमुख मार्गदर्शक प्रा. माधव गुरनुले हे होते. यावेळी मराठी विभाग प्रमुख प्रा. एस.आर. लोनबले, हिंदी विभाग प्रमुख डॉ. आर. एम. पाटील, रासेयो. प्रमुख डॉ.आर. यु. मुरमाडे, सहअधिकारी प्रा. रवी वाळके हे उपस्थित होते.

लोकशाही बळकटीकरिता शासनाचा हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. यावेळी वय वर्षे १८ व त्यापुढील वयोगटातील युवकांची मतदार नोंदणी करण्यात आली.

नेरी परिसरातील नागरिकांनी या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सदर अहवाल आपल्या माहितीस सादर.





## डॉ. खत्री महाविद्यालय तुकूम, चंद्रपूर
## राष्ट्रीय सेवा योजना विभाग
## सूर्यनमस्कार कार्यक्रमाचा अहवाल
## १४ जानेवारी २०२२

कोविड -१९ च्या पार्श्वभूमीवर गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली राष्ट्रीय सेवा योजना विभागच्या संदर्भ अ.शा. पी.२४-१ /रासेयो /निदेशा /२०२१ /१० -२५ दि. १० जानेवारी २०२२ नुसार महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ. जे. एम. काकडे यांचे मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभाग व शारीरिक शिक्षण विभागाचे वतीने दि. १४ जानेवारी २०२२ रोजी 'मकरसंक्रांत' दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयाचे पटांगणात 'सूर्यनमस्कार' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यामध्ये रासेयो.विभाग व शारीरिक शिक्षण विभागाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग दर्शविला. या कार्यक्रमाचे आयोजन रासेयो प्रमुख डॉ. आर. यु. मुरमाडे व शा. शि.विभाग प्रमुख प्रा. आशिष चहारे यांनी केले.

सदर कार्यक्रमाचा अहवाल आपल्या माहितीस सादर.






## डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
## राष्ट्रीय सेवा योजना विभाग
## रक्तदान शिबिराचा अहवाल

राष्ट्रीय सेवा योजना विभाग , शारीरिक शिक्षण विभाग व इंडियन रेडक्रोस सोसायटी यांचे संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दि. ८ मार्च २०२२ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.एम. काकडे यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आले. रक्तदान शिबीर करिता इंडियन रेडक्रोस सोसायटीचे सचिव डॉ. मंगेश गुलवाडे, डॉ. अनुप पालीवाल, डॉ. दाभेरे, डॉ. अनंत हजारे व प्रा. डॉ. पियुष मेश्राम यांची उपस्थिती होती.

सदर कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष आदरणीय डॉ. एन.एच. खत्री सर यांनी सदिच्छा भेट दिली व शुभेच्छा दिल्या. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग व शारीरिक शिक्षण विभागाच्या विद्यार्थ्यांनी तसेच प्राध्यापक वृंद यांनी रक्तदान केले.

सदर कार्यक्रमाचे आयोजन रासेयो प्रमुख डॉ. आर.यु. मुरमाडे, सह-अधिकारी प्रा. आशिष चहारे , प्रा.दिलीप बावणे यांनी केले.

सदर अहवाल आपल्या माहितीस सादर.



## डॉ. खत्री महाविद्यालय तुकूम, चंद्रपूर

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## संविधान जागर कार्यक्रम अहवाल

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली संदर्भ पत्र क्र. No. GU/ NSS/ 85/2022 नुसार डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर येथे संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिवसाचे औचित्याने दि. १६ एप्रिल २०२२ रोजी ‘संविधान जागर ‘ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य डॉ. जे.एम. काकडे हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून शांताराम पोटदुखे विधीमहाविद्यालय चंद्रपूर येथील डॉ. पंकज काकडे होते. यावेळी विचारमंचावर डॉ. जी. आर. सपाट, डॉ. व्ही. व्ही. लाडे व आयोजक डॉ. आर. यु. मुरमाडे हे उपस्थित होते.

‘भारतीय संविधान’ या विषयावर डॉ. पंकज काकडे यांनी सविस्तर मांडणी केली. यावेळी बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी रासेयो प्रमुख डॉ. आर यु. मुरमाडे , सहकार्यक्रम अधिकारी प्रा. आशिष चहारे, प्रा. दिलीप बावणे यांनी परिश्रम घेतले.



# डॉ. खत्री महाविद्यालय तुकूम, चंद्रपूर
## राष्ट्रीय सेवा योजना विभाग
## विशेष शिबीर अहवाल
२३/०३/२०२२ ते २९/०३/२०२२

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत संदर्भ पत्र क्र. No. GU/NSS/65/2021 नुसार आमच्या महाविद्यालयाचे रासेयो विशेष शिबीर जि.प. उच्च प्राथमिक शाळा, तीरवंजा येथे २३मार्च ते २९ मार्च २०२२ या कालावधीत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.एम. काकडे व गोंडवाना विद्यापीठाचे रासेयो चे संयोजक मा.डॉ. श्याम खंडारे यांचे मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.

या सात दिवस चालणाऱ्या विशेष शिबिरात विविध उपक्रम राबविण्यात आले. दि.२३ मार्च २०२२ रोजी शिबिरार्थींचे मु. तीरवंजा येथे आगमन झाले व स्वयंसेवकांमार्फत परिसर स्वच्छ करण्यात आले. दि. २४ मार्च २०२२ रोजी विशेष शिबिराचा उदघाटन सोहळा संस्थेचे उपाध्यक्ष मा. ह. ना. जांभुळे सर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला. उद्धाटक म्हणून तिरवंजा येथील सरपंच सौ. अर्चनाताई साव या होत्या.प्रमुख अतिथी म्हणून मा. प्राचार्य डॉ. जे.एम.काकडे, उपसरपंच श्री. प्रशांत कोपुला, तंटामुक्ती अध्यक्ष श्री. श्रीकांत ताजने, पोलीस पाटील श्री. दिलीप पिंगे, माजी प्राचार्य डॉ. एस.बी. मोहितकर, डॉ. पी.एम. तेलखडे हे उपस्थित होते.२५ मार्च रोजी सकाळी ग्रामस्वच्छता अभियान व समाजशास्त्र विभागतर्फे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक सर्वेक्षण करण्यात आले. रोजगार व कौशल्य विकास मार्गदर्शन या विषयावर श्री. विलास मोरे यांनी मार्गदर्शन केले. सायंकाळी सांस्कृतिक व जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले.

दि.२६ मार्च २०२२ रोजी सकाळी ग्रामस्वच्छता स्वच्छता अभियान व विद्यार्थी संवाद हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना 'स्वामी विवेकानंद सचित्र जीवन चरित्र' या पुस्तकाचे वितरण करण्यात आले. दुपारी इंडियन मेडिकल असोसिएशन व इंडियन रेडक्रॉस सोसायटी चंद्रपूर यांचे सौजन्याने डॉ. मंगेश गुलवाडे यांचे मार्गदर्शनाखाली गावातील नागरिकासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर करण्यात आले. सायंकाळी श्री. भारशंकर सर यांच्या चमूने भक्तीसंगीत कार्यक्रम सादर केला. दि. २७ मार्च २०२२ रोजी स्वच्छता अभियान व पर्यावरण शास्त्र विभागतर्फे पर्यावरण सर्वेक्षण करण्यात आले. डॉ. एम. जी. ठाकरे यांनी पर्यावरण संवर्धन काळाची गरज याविषयावर व्याख्यान सादर केले.

दि. २८ मार्च २०२२ संस्थेचे उपाध्यक्ष आदरणीय ह. ना. जांभुळे यांचे अध्यक्षतेखाली समारोपीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.एम. काकडे, सरपंच सौ. अर्चनाताई साव, शिवाभाऊ येरगुडे, श्री. योगीराज भुसारी, सौ. मनीषा येरगुडे, डॉ. जी. आर. सपाट हे उपस्थित होते.समारोपीय कार्यक्रमात विशेष शिबिराला सहाय्य करणाऱ्या गावातील व्यक्तींचा विशेष सत्कार करण्यात आला. दुपारी शिबिरात राबविलेल्या कामाचा आढावा व पुढील कामाचे गटनिहाय नियोजन करण्यात आले. २९ मार्च २०२२ रोजी सकाळी परिसर स्वच्छता, दुपारी शिबिरार्थींचे भोजन त्यांनतर शिबिराचे स्वयमू ल्यांकन व मानांकन करण्यात आले. व सायंकाळी ५ .०० वाजता शिबिरार्थींचे प्रस्थान झाले.

या विशेष शिबिराचे संपूर्ण नियोजन रासेयो प्रमुख डॉ. आर.यु. मुरमाडे व सहप्रमुख प्रा. आशिष चहारे यांनी केले.

विशेष शिबिराला सहाय्यक समितीचे डॉ. एस. बी.कपूर, डॉ. शरयू कटकमवार, डॉ. वंदना वैद्य, डॉ. व्ही. व्ही. लाडे, डॉ. पी.आर. मोहरकर, प्रा. सुप्रिया सादलवार, प्रा. करुणा खोब्रागडे, प्रा. शुचिता दाभेकर यांचे सहकार्य लाभले. सदर विशेष शिबिराचा अहवाल आपल्या माहितीस सादर.

# विशेष शिबीर छायाचित्रे

२३/०३/२०२२ ते २९/०३/२०२२





# विशेष शिबीर छायाचित्रे
## २३/०३/२०२२ ते २९/०३/२०२२




